# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पुनरूत्थान काळातील पाचवा रविवार

## सांयप्रार्थना

*महत्वाची सूचना ः सदर प्रार्थना ही ख्रिस्तसभेची अधिकृत प्रार्थना आहे. कोविड १९ चा प्रादुर्भाव लक्षात घेता ही प्रार्थना आपण आपल्या कुटुंबात एकत्रित करावी ही नम्र विनंती.*

**चरण:** हे देवा, आमच्या सहाय्यास ये.

**प्रतिसाद:** हे प्रभो, माझ्या सहाय्यास धावून ये.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**गीत** ः पुनरूत्थान गीत

**प्रतिगीत १:** ख्रिस्त उठला आहे आणि देवाच्या उजवीकडे बसला आहे, आल्लेलुया.

**स्तोत्र ११० : १ - ५, ७**

**मा**झ्या प्रभूला परमेश्‍वर म्हणतो,
मी तुझे वैरी तुझे पदासन करीपर्यंत
तू माझ्या उजवीकडे बैस.

**प**रमेश्‍वर तुझे बलवेत्र सियोनेतून पुढे नेईल;
तो म्हणतो, तू आपल्या शत्रूवर प्रभुत्व कर.

**तु**झ्या पराक्रमाच्या दिवशी तुझे लोक संतोषाने पुढे होतात,
पावित्र्याने मंडित झालेले तुझे तरूण
तुला पहाटेच्या दहिवरासारखे आहेत.

परमेश्वराने शपथ वाहिली आहे
आणि ती तो बदलणार नाही;
ती अशी की, मलकीसदेकाच्या संप्रदायाप्रमाणे
तू युगानुयुग याजक आहेस.

तुझ्या उजव्या हाताकडे असलेला प्रभू
आपल्या क्रोधाच्या दिवशी राजांचा बीमोड करील;

मार्गाने चालत असता तो ओहोळातले पाणी पिईल;
आणि आपले डोके वर करील.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

प्रतिगीत १: ख्रिस्त उठला आहे आणि देवाच्या उजवीकडे बसला आहे, आल्लेलुया.

********

प्रतिगीत २: त्याने आपल्याला अंधाराच्या राज्यातून बाहेर काढले आहे आणि पुत्राच्या राज्यात स्थान दिले आहे, आल्लेलुया.

स्तोत्र ११४

इस्त्राएल मिसर देशातून निघाला,
याकोबाचे घराणे परकी भाषा बोलणाऱ्या लोकांतून निघाले;
तेव्हा यहूदा त्याचे पवित्रस्थान झाला,
इस्त्राएल त्याचे राज्य झाला.

हे पाहून समुद्र पळाला;
यार्देन मागे हटली.
पर्वतांनी मेंढयांसारख्या आणि टेकडयांनी कोकरांसारख्या उडया मारल्या.

हे समुद्रा, तुला काय झाले म्हणून तू पळतोस?
हे यार्देने, तुला काय झाले म्हणून तू मागे हटतेस?
अहो पर्वतांनो, तुम्हाला काय झाले म्हणून तुम्ही मेंढयांसारख्या उडया मारता?
अहो टेकडयांनो, तुम्हाला काय झाले म्हणून तुम्ही कोकरांसारख्या उडया मारता?

**हे** पृथ्वी, तू प्रभूसमोर, याकोबाच्या देवासमोर, थरथर काप.
तो खडक पालटून पाण्याचे तळे करतो,
गारेचा खडक पालटून पाण्याचा झरा करतो.

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत २:** त्याने आपल्याला अंधाराच्या राज्यातून बाहेर काढले आहे आणि पुत्राच्या राज्यात स्थान दिले आहे, आल्लेलुया.

*********

**प्रतिगीत ३:** आल्लेलुया, परमेश्वर, आपला देव, हा राजा आहे; आपण उल्हास करू आणि त्याची स्तुती करू, आल्लेलुया.

**प्रकटी १९ :१ - २, ५ - ७**

'आल्लेलुया', तारण, गौरव व सामर्थ्य ही आमच्या देवाची आहेत; (प्र. आल्लेलुया)

कारण 'त्याचे न्याय निर्बंध सत्याचे' व 'नीतीचे' आहेत. प्र. आल्लेलुया (आल्लेलुया).

आल्लेलुया अहो आमच्या देवाची भीती बाळगणाऱ्या
सर्व लहानथोर दासांनो त्याचे स्तवन करा, (प्र. आल्लेलुया)

'आल्लेलुया', कारण सर्वसमर्थ आमचा 'प्रभू' देव
ह्याने राज्य हाती घेतले आहे. (प्र. आल्लेलुया)

आपण आनंद व उल्हास करू व त्याचे गौरव करू; प्र. आल्लेलुया (आल्लेलुया).

आल्लेलुया, कारण कोकराचे लग्न निघाले आहे,
आणि त्याच्या नवरीने स्वत:ला सजविले आहे. प्र. आल्लेलुया (आल्लेलुया).

पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो,
जसा प्रारंभी तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**प्रतिगीत ३:** आल्लेलुया, परमेश्वर, आपला देव, हा राजा आहे; आपण उल्हास करू आणि त्याची स्तुती करू, आल्लेलुया.

**शास्त्रवाचन** इब्री १०: १२ - १४

पापांबद्दल सार्वकालिक असा एकच यज्ञ अर्पून हा देवाच्या उजवीकडे बसला आहे; आणि तेव्हापासून आपले वैरी आपले पदासन होईपर्यंत वाट पाहात आहे. कारण पवित्र होणाऱ्यांना त्याने एकाच अर्पणाने सर्वकाळचे पूर्ण केले आहे.

**लघु प्रतिसाद**

प्रतिसाद: प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.
प्रतिसाद: प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.
चरण: तो शिमोनाच्या दृष्टीस पडला आहे.
प्रतिसाद: प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.
त्रैक्य स्तुती: पिता, पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
प्रतिसाद: प्रभू खरोखर उठला आहे, आल्लेलुया, आल्लेलुया.

**मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत:** प्रभू म्हणतो, "मी तुम्हाला नवीन आज्ञा देतो. जशी मी तुम्हावर प्रीती केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती करा", आल्लेलुया.

**मरियेचे स्तोत्र:** (लूक १:४६-५५)

'माझा जीव प्रभूला' थोर मानितो
आणि 'देव जो माझा तारणारा'
त्याच्यामुळे माझा आत्मा 'उल्हासला आहे;'

कारण 'त्याने' आपल्या 'दासीच्या दैन्यावस्थेचे अवलोकन केले आहे.'
पाहा, आतापासून सर्व पिढया मला धन्य म्हणतील;

कारण जो समर्थ आहे,
त्याने माझ्याकरिता महत्कृत्ये केली आहेत;
आणि 'त्याचे नांव पवित्र आहे,'
आणि जे 'त्याचे भय धरितात,
त्यांच्यावर त्याची दया पिढयान्‌पिढया आहे.'

**त्या**ने आपल्या बाहूने पराक्रम केला आहे;
जे आपल्या अंत:करणाच्या कल्पनेने 'गर्विष्ठ आहेत
त्यांची त्याने दाणादाण केली आहे.'

'**त्या**ने अधिपतींस' राजसनांवरून 'ओढून काढिले आहे,'
'त्याने भुकेलेल्यांस उत्तम पदार्थांनी तृप्त केले आहे,'
व 'धनवानांस रिकामे लावून दिले आहे.'

**आ**पल्या पूर्वजांस' त्याने सांगितले 'त्याप्रमाणे आब्राहाम'
व त्याचे 'संतान ह्यांच्यावरील दया' सर्वकाळ 'स्मरून
त्याने आपला सेवक इस्त्राएल ह्याला साहाय्य केले आहे.'

**पि**ता पुत्र आणि पवित्र आत्मा ह्यांचा गौरव असो.
जसा प्रारंभी होता तसा आता आणि सदासर्वदा असो. आमेन.

**मरियेच्या स्तोत्राचे प्रतिगीत:** प्रभू म्हणतो, "मी तुम्हाला नवीन आज्ञा देतो. जशी मी तुम्हावर प्रीती केली तशी तुम्हीही एकमेकांवर प्रीती करा", आल्लेलुया.

## विनंत्या

प्रतिसाद: हे विजयी राजा, आमची प्रार्थना ऐक.

**आ**पण आनंदाने ख्रिस्त प्रभूकडे प्रार्थना करू या. तो मरणातून जिवंत झाला आणि आता आपल्यासाठी मध्यस्थी करीत असतो. प्रतिसाद: हे विजयी राजा, आमची प्रार्थना ऐक.

**हे** ख्रिस्ता, तू जगाचा प्रकाश आणि राष्ट्रांचे तारण आहेस. - तुझ्या अद्भुत पुनरूत्थानाची घोषणा करीत असताना आमच्यावर तुझ्या पवित्र आत्म्याच्या अग्नीचा वर्षाव कर. प्रतिसाद: हे विजयी राजा, आमची प्रार्थना ऐक.

**ज्या** मसिहाची इस्त्राएली लोक आतुरतेने वाट पाहात आहेत तो तूच आहेस हे त्यांना समजू दे - सर्व मनुष्यांना तुझ्या वैभवाच्या ज्ञानाने भरून टाक. प्रतिसाद: हे विजयी राजा, आमची प्रार्थना ऐक.

**स**र्व संतांच्या एकोप्याशी आमचेही ऐक्य घडवून आण - आमचे सर्व काम संपल्यावर आम्हाला त्यांच्याठायी विसावा मिळावा असे कर. प्रतिसाद: हे विजयी राजा, आमची प्रार्थना ऐक.

**मा**णसाचा शेवटचा शत्रू असलेल्या मृत्यूवर तू विजय मिळविलास.- परमेश्वराशी विसंगत असलेल्या आमच्यामधील विकृती नाहिशा कर. प्रतिसाद: हे विजयी राजा, आमची प्रार्थना ऐक.

**ख्रि**स्ता, आमच्या तारका, तू मरणापर्यंत आज्ञाधारक राहिलास परंतु देवाने तुला उच्चपद दिले. - आमच्या मृत बांधवांना तुझ्या वैभवशाली राज्यात प्रवेश दे. प्रतिसाद: हे विजयी राजा, आमची प्रार्थना ऐक.

**आ**मच्या स्वर्गीय बापा ...

## समारोपाची प्रार्थना

हे प्रभो, आमच्या स्वर्गीय बापा, आम्हाकडे आपली दयादृष्टी वळव. तू आम्हाला पापमुक्त करतोस व ख्रिस्ताठायी तुझी मुले बनवतोस. आम्हाला परिपूर्ण स्वातंत्र्य दे व तू अभिवचन दिलेल्या वतनाचा स्वीकार करण्यास पात्र कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात, सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो.

## समारोप विधी:

प्रभू आम्हाला आशीर्वाद देवो, सर्व वाईटांपासून आम्हाला सुरक्षित ठेवो आणि आम्हाला सार्वकालिक जीवनाकडे नेवो.

प्रतिसाद: आमेन.